# 2022
# वार्षिक राशिभविष्य



# मेष

वर्षाच्या सुरुवातीपासून महत्त्वाची अति कठीण कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न मेष राशीच्या व्यक्तीने करावा. धडाडी धाडस मेष राशीच्या व्यक्तीकडे उत्तम असते. नेतृत्व करण्याची आवड असते. एप्रिल, ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यांमध्ये संमिश्र स्वरूपाच्या घटना घडतील. वर्षाच्या उत्तरार्धात नवे आवाहन स्वीकारावे लागेल. कोणताही निर्णय मार्च, सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये उतावळेपणाने घेऊ नका. एप्रिल, ऑक्टोबर मध्ये प्रवासात सावध राहा. धोका होईल. ताण तणाव वाढेल. प्रकृतीची काळजी घ्या. जानेवारी, फेब्रुवारी, एप्रिल ते जून या महिन्यात नोकरीत चांगला बदल करण्याची संधी मिळेल परंतु निर्णय सावधपणे घ्या. ऑगस्ट ,ऑक्टोबर मध्ये बेकायदा कृत्य होणार नाही याची काळजी घ्या. नोकरी टिकवा. व्यवसायात वर्षाच्या सुरुवातीला मोठी चांगली संधी मिळेल. मार्च, जुलै, सप्टेंबर मध्ये भावनेच्या आहारी न जाता निर्णय घ्या. प्रेमात तणाव फसगत होईल.  कौटुंबिक समस्या निर्माण होईल.कोर्टकचेरीच्या चक्रात अडकाल. व्यसनाने वाईट संगती ने तरुणांचे नुकसान होईल. वडील माणसांचा सल्ला घ्या. पोटाची काळजी घ्या. सकस आहार ठेवा. व्यायाम करा. यामुळे समस्या वाढणार नाहीत. छोटे ऑपरेशन करण्याची वेळ येऊ शकते. वैवाहिक जीवनात तणाव वाढवू नका. प्रेमात वहावत जाऊ नका. मौल्यवान वस्तू ऑक्टोबर नंतर सांभाळा.राजकीय सामाजिक क्षेत्रात वर्षाच्या सुरुवातीला महत्त्वाचे डावपेच यशस्वी करता येतील. लोकसंग्रह वाढवता येईल. मान प्रतिष्ठा जानेवारी ते एप्रिल भरपूर वाढेल. मात्र नवीन डाव पेच टाकताना जुलै, नोव्हेंबर या महिन्यात जास्त काळजी घ्या. मार्च, ऑगस्टमध्ये  प्रक्षोभक वक्तव्य टाळा. कायद्याच्या कक्षेत राहून प्रतिक्रिया व्यक्त करा म्हणजे मानहानी टाळता येईल .

# वृषभ

नवीन वर्ष वृषभ राशीच्या व्यक्तींना भरभराटीचे ठरेल. तुमच्या क्षेत्रात तुमचे स्थान मजबूत करता येईल. कोणतेही कठीण वाटणारे काम करून घ्या. नोकरीत प्रगती कारक घटना घडतील. परदेशात जाण्याची संधी मिळेल. उत्साह व आत्मविश्वास वाढेल. एप्रिल, ऑक्टोबर ते डिसेंबर या महिन्यांमध्ये कोणतेही काम करताना सावध राहा. प्रतिष्ठा सांभाळा. नम्रता ठेवा. व्यवसायात या वर्षात जम बसेल. कर्जाचे काम करून घेता येईल. नवीन योजनांचा लाभ घेता येईल. मे, ऑक्टोबर मध्ये भावनेच्या आहारी न जाता व्यवहारीक निर्णय घ्या. पैसा नीट सांभाळा. नवीन मैत्री धोकादायक ठरेल. प्रेमात तणाव होईल. या वर्षात घर जमीन दुकान खरेदी विक्री लाभ होईल.शेअर्समध्ये योग्य सल्याने गुंतवणूक करा. कोर्टाच्या संबंधी कामे करून घ्या. नवीन ओळखीचा उपयोग फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, जुलै,ऑगस्टमध्ये होईल. तसेच पुन्हा वाद मिटवून नव्याने जीवनात सुरुवात करता येईल. प्रकृतीत सुधारणा होईल. प्रवासाचा बेत ठरवता येईल. कायदा कुठेही मोडू नका. जानेवारी, जून, जुलैमध्ये दुखापत ऑपरेशन ही शक्यता आहे. प्रवासात सावध राहा. रागावर ताबा ठेवा. राजकीय सामाजिक कार्यात तुमच्या कार्याचा ठसा उमटवता येईल. एप्रिल,मे, ऑक्टोबर मध्ये कोणतेही वक्तव्य करताना विचार करा. नकळत चूक होईल. या वर्षात तुमच्या क्षेत्रात तुम्ही आघाडीवर राहाल. शिक्षणात प्रगती कराल योग्य सल्ल्याने वागा. स्वतःची मनमानी केल्याने चांगला कालावधी निघून जातो. संधीचा फायदा घ्या. स्वतःच्या उन्नतीचा विचार करा व कृती करा.

# मिथुन

नवीन वर्ष मिथुन राशीला प्रगतीच्या मार्गावर देणारे ठरेल. अनेक वाटा तुम्हाला समोर दिसतील. विचारपूर्वक ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास फार मोठे यश संपादन करता येईल. बुद्धिचातुर्य तुमच्याकडे उत्तम आहे फक्त प्रयत्नांचे सातत्य ठेवा. कोणतेही काम करताना कायदा मोडू नका. व्यवसायात फार पुढे जाता येईल. आर्थिक गुंतवणूक करता येईल. फक्त योग्य मार्गाने पैसे कमवा. जानेवारी,फेब्रुवारी,जून मध्ये आरोप येतील. हातून कळत नकळत चूक होईल. व्यवहारात फसगत होईल. नोकरीच्या कामात सतर्क रहा. मोहाला बळी पडू नका. ऑगस्ट मध्ये वाहन जपून चालवा. प्रकृतीची काळजी घ्या. एखादे ऑपरेशन होईल. किडनीचा त्रास संभवतो. तसेच कोर्टकचेरीच्या कामात बेसावध राहू नका. कोणत्याही समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग मात्र शोधता येईल. एप्रिल,जून ते सप्टेंबर मध्ये नोकरीत चांगला बदल करता येईल. राजकीय-सामाजिक क्षेत्रात अधिकार पद मिळेल. नावलौकिकात भर पडेल. तुमच्या क्षेत्रात तुम्ही यश मिळवाल. वाहन घर जमीन इत्यादी खरेदी विक्री या वर्षात करता येईल. कोणताही किचकट प्रश्न मे ते जुलैमध्ये मिटवून टाका. विद्यार्थी वर्गाने आळस न करता अभ्यास करावा. चांगली संगत ठेवा. वेळेचा सदुपयोग करा. तुमच्या मनाप्रमाणे यश मिळवता येईल. ग्रहांची साथ असताना माणसाने गाफील राहून वेळ फुकट घालवू नये. जानेवारी ते सप्टेंबर मध्ये येणाऱ्या परीक्षेसाठी जास्त तयारी करावी लागेल. प्रकृतीची काळजी घ्यावी. वहावत जाऊ नये. ठराविक वेळेला ठराविक गोष्टी करणे महत्त्वाचे असते. चांगले अनुकरण करणे फायद्याचे असते. परंतु सोपे वाटते म्हणून वाकडी वाट धरणे म्हणजे जीवन धोक्यात घालण्यासारखे असते. अविवाहितांना लग्नासाठी स्थळे मिळतील.

# कर्क

नवीन वर्षाच्या उत्तरार्धात तुमच्या प्रगतीला वेगाने सुरुवात होईल. वर्षाच्या सुरुवातीला कोणालाही मदत करताना नीट विचार करा. विद्यार्थी वर्गाने अभ्यासात जास्त लक्ष द्यावे. जानेवारीत पोटाची काळजी घ्यावी. प्रवासात घाई करू नका. कोणत्याही प्रकारचा वाद जास्त वाढू देऊ नका. चुकीच्या मार्गाने यश मिळवण्याचा प्रयत्न करू नका. अडचणी वाढतील. कायद्याच्या चक्रात अडकाल.नोकरीत फेब्रुवारी मध्ये तणाव होईल. कामाचा व्याप वाढेल. अचानक बदलीची शक्यता आहे. तडजोड करावी लागेल. ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये प्रगतीकारक फायदेशीर बदल नोकरीत करता येईल. व्यवसायात एप्रिल नंतर अधिक वाढ होईल. मार्च,जुलै मध्ये भावनेच्या आहारी जाऊन कोणताही निर्णय घेऊ नका. कुटुंबात समस्या येईल. प्रकृतीची काळजी घ्या. राजकीय-सामाजिक क्षेत्रात जानेवारी, मार्च,एप्रिल,ऑगस्ट ते ऑक्टोबर मोठे यश संपादन कराल. निवडणूक यशस्वी कराल. मोठे पद मिळेल. प्रतिष्ठा मिळेल. जनसंपर्क वाढवता येईल. जुना वाद अथवा गैरसमज दूर करण्याची संधी मिळेल. कोर्टकचेरीच्या कामात यश मिळेल. जून-जुलैमध्ये आर्थिक लाभ झाला तरी मनावर दडपण आणणारी घटना घडेल. वैवाहिक जीवनातील ताणतणाव कमी होतील. अविवाहितांना लग्नासाठी योग्य स्थळांची निवड करता येईल. संतती प्राप्तीसाठी प्रयत्न करता येईल. जीवनाच्या वाटचालीत माणसाकडून काही चुका घडतात त्या सुधारण्याची संधी तुम्हाला या वर्षात मिळणार आहे. त्यामुळे निराश न होता तुम्ही आत्मविश्वासाने व उत्साहाने कामाची सुरुवात करा. तुमच्या आवडत्या क्षेत्रात तुम्हाला मनाप्रमाणे काम करता येईल. जुने गैरसमज दूर करून पुन्हा नव्याने नाते तयार करता येईल.

# सिंह

नवीन वर्षाच्या सुरुवातीपासून तुम्ही तुमच्या क्षेत्रातील कामे कोणत्या पद्धतीने पूर्ण करता येतील यावर लक्ष केंद्रीत करा. दिग्गज लोकांच्या सहाय्याने समस्या सोडवा. अनेक प्रश्नांवर चर्चा करून त्यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधा. जानेवारी, एप्रिल,जुलैमध्ये नोकरीत सावधपणे निर्णय घ्या. वरिष्ठांच्या समावेत तणाव करू नका म्हणजे जास्त अडचणी येणार नाही. व्यवसायात फेब्रुवारी,मार्च, ऑगस्टमध्ये लाभदायक कामे मिळवता येतील. नंतर शक्यतो नवीन धंद्यात जाऊन पैशाची गुंतवणूक करून पुढे जाण्याचा विचार करू नका. अडचणी येतील. तसेच कोणतेही काम करताना कायदा पाळा. एप्रिल,जुलै मध्ये जास्त मोह ठेवू नका. तसेच गोड बोलणाऱ्या व्यक्तीच्या भूलथापांवर विश्वास ठेवून कोणतेही निर्णय घेऊ नका. राजकीय-सामाजिक क्षेत्रात नवीन वर्षाच्या उत्तरार्धात विरोधक तुमच्या विरोधात कांड रचण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या कामावर निर्णयावर चौफेर तुमच्यावर लक्ष असणार आहे हे विसरू नका. उतावळेपणाने निर्णय घेऊ नका. प्रक्षोभक प्रतिक्रिया व्यक्त करू नका. तुमचा राग वाढवण्याचा प्रयत्न फेब्रुवारी,मार्च या काळात होईल. तुमची विचारसरणी समतोल राखा. काही वेळेस तटस्थ भूमिका घ्यावी लागेल. प्रवासात मे, जुलै या कालावधीत सावध रहा. कौटुंबिक क्षेत्रात तुमचा विचार बरोबर असला तरी तुमच्यावर नाकर्तेपणाचा आरोप लावण्यात येईल. वाटाघाटी संबंधी चर्चा करताना सावध राहा. जानेवारी,एप्रिल,ऑगस्ट कालावधीत आपसात गैरसमज होईल. तुमच्या रागाचा पारा चढेल. मार्च, जुलै कोर्ट केस मध्ये या काळात सावध राहा.. घर वाहन जमीन खरेदी विक्री करताना योग्य सल्ला घ्या. जवळच्या अनेक लोकांच्या स्वभावाचा नवा पैलू दिसून येईल. तुम्ही सर्वच ठिकाणी जगात वागण्याची नवी रीत शिकाल. शिक्षणात नुसते नवे स्वप्न बघून चालणार नाही तर त्यासाठी जास्त मेहनत घ्यावी लागेल. फेब्रुवारी, एप्रिल ते जून, ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात येणाऱ्या परीक्षा चांगल्या असतील. परदेशात जाण्याचा उतावळेपणा करु नका. नियमानुसार वागा. संगत चांगली ठेवा म्हणजे प्रगतीची वाट चुकणार नाही. जीवनात अडचणी येतच असतात व जातही असतात त्यामुळे निराश न होता जिद्द ठेवा. मेहनत घ्या. तुमच्या क्षेत्रात टिकून राहा. क्षेत्र बदलण्याची घाई करू नका. पुढे चांगली संधी मिळणार आहे हे नक्की. जे पद अधिकार तुमच्याकडे आहेत ते टिकवण्याची हिम्मत ठेवा.

# कन्या

नवीन वर्ष संमिश्र स्वरूपाचे ठरणार आहे. ऑगस्ट 2022 पासून अनेक समस्या सोडवण्यात यश येईल. तुमचा आत्मविश्वास वाढेल. मे ते जुलैमध्ये विरोधक वाढतील. परंतु मित्राचे शत्रु व शत्रुचे मित्र या काळात होतील. त्यामुळे कोणताही निर्णय निश्चित करण्याची घाई करू नका. नोकरीच्या कामात फेब्रुवारी, एप्रिल, ऑगस्टमध्ये मनस्ताप होईल. वरिष्ठांना दुखवू नका. राजकारण करून तुम्हाला कमी लेखण्याचा प्रयत्न होईल. नोकरी वरील काळात टिकवा. थोड्याच अवधीत प्रगती कारक नोकरी मिळेल. शिक्षणाच्या क्षेत्रात तुम्हाला मनाची एकाग्रता ठेवावी लागेल. क्षेत्र वारंवार बदलण्याच्या विचाराने तुम्ही शिक्षणात मागे राहाल. सरळ मार्गाने एकाच ट्रॅकवर प्रथम शिका. नंतर जून 2022 नंतर तुम्हाला योग्य दिशेने वाटचाल करता येईल. वैवाहिक जीवनात मार्च, सप्टेंबर मध्ये गैरसमज वाद होईल. घटस्फोटापर्यंत प्रकरण जाऊ शकते. सौम्य धोरण ठेवा. तडजोड करा. जून नंतर काहीतरी चांगला निर्णय घेता येईल. कौटुंबिक वाटाघाटी संबंधित चर्चा एप्रिल नंतर करता येईल. कोणत्याही विषयी चाललेली कोर्ट केस वर्षाच्या पूर्वार्धात फार त्रासदायक होईल. बेसावध राहू नका. कायदा झुगारून वक्तव्य करू नका. मारामारी प्रसंग एप्रिल जून मध्ये येतील. दुखापत संभवते. तसेच प्रवासात सावध राहा. वाहन जपून चालवा.राजकीय सामाजिक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी जिद्द ठेवा. विरोधक तुमच्यावर टीका करण्याची संधी सोडणार नाही. कायद्याला कमी लेखू नका. फेब्रुवारी, ऑगस्टमध्ये आरोप येईल. प्रतिष्ठा धोक्यात आणण्याचा जोरदार प्रयत्न होईल. कोर्ट केस मध्ये समस्या कठीण होईल. मे जून, जुलै, सप्टेंबर मध्ये समस्येवर उपाय शोधता येईल. अधिकार मिळेल. तुमचे वर्चस्व सर्वच क्षेत्रात वाढेल. भाषणातील मुद्दे प्रभावी ठरतील. लोकप्रियता मिळेल. कोणताही वाद मिटवण्याची संधी मिळेल. नावलौकिक वाढल्याने समाजकार्याला थोरा-मोठ्यांच्या ची मदत मिळेल. जनहिताचे कार्य वाढवता येईल. नवीन ओळखी जून-जुलै मध्ये होतील. आर्थिक सहाय्यक जमा करून तुम्हाला तुमच्या संस्थेला मोठे स्वरूप देता येईल. तुमच्या बुद्धी चातुर्याचा, तडफदार, सतत उद्योगी स्वभावाचा उपयोग निश्चितपणे करून घेता येईल.

# तुला

नवीन वर्ष उत्साहाचे व नव्या कार्याच्या आरंभाचे ठरेल. कोणतेही क्षेत्र असो तुम्ही वेळकाढू धोरण कुठे ही ठेवू नका. प्रगतीच्या दिशेने जाण्यासाठी योग्य कार्य रचना करा. त्यामुळे वेळेचा चांगला उपयोग होईल. ग्रहस्थिती चांगली पाठीशी असताना माणसाने जास्त प्रयत्न केले तर मोठे यश मिळवता येते. वर्षाच्या उत्तरार्धात तुम्हाला अडचणीतून मार्ग काढावा लागणार आहे. तुमच्या मेहनतीची परीक्षा पाहिली जाईल. विरोधक तुम्हाला हरवण्याचा, कमी लेखण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे भावनेच्या आहारी न जाता खंबीरपणे निर्णय एप्रिल, जून, सप्टेंबर मध्ये घ्यावे लागतील. तसेच प्रकृतीची काळजी घ्या. कोणत्याही व्यवहारात फसु नका. नवीन परिचय धोकादायक ठरू शकतो हे विसरू नका. मौल्यवान वस्तू सांभाळा. मैत्रीत गैरसमज होईल. कुटुंबात क्षुल्लक वाद वाढेल. व्यवसायात तुम्हाला मोठा पल्ला गाठणे कठीण आहे त्यामुळे जे काम हातात आहे त्यालाच नीट सांभाळून व्यवसाय चालू ठेवा. नवीन बदल करण्याची घाई या वर्षात करून नका. नोकरीत सप्टेंबरमध्ये कोणतेही बेकायदा काम करू नका. काम करण्यात चूक करू नका. वरिष्ठांच्या बरोबर वाद करू नका. सामाजिक क्षेत्रात महत्वाची योजना पूर्ण करण्यासाठी नवीन वर्षाच्या सुरुवातीपासून प्रयत्न करा. विरोधकांना कमी लेखू नका. अहंकार पूर्ण भाषा मार्च मध्ये त्रासदायक ठरेल. प्रतिष्ठा टिकवा. प्रक्षोभक भाषण तुम्ही टाळा. गोड बोलून प्रश्न मार्गी लावा. एप्रिल, जून, सप्टेंबर मध्ये विरुद्धलिंगी व्यक्तीकडून मनस्ताप होईल. मोहाला बळी पडू नका. भावनेच्या भरात कोणतेही आश्वासन देऊ नका. महत्त्वाची कागदपत्रे सांभाळा. मार्च ऑगस्टमध्ये प्रवासात सतत सावध रहा. वाहनाचा वेग कमी ठेवा. प्रकृतीची काळजी घ्या. राग वाढवणाऱ्या घटना घडतील. संयम ठेवा. वाईट काळात आपल्याला शत्रु व मित्र यांची योग्य पारख करता येते. त्यामुळेच आपण अधिक प्रगल्भ विचारांचे होतो. ज्ञानात भर पडेल.

# वृश्चिक

मागील वर्षापेक्षा या वर्षाच्या सुरुवातीला कायद्यानुसार जे योग्य असेल तेच करा. घाईत निर्णय घेऊ नका. फेब्रुवारी क्षुल्लक तणाव होईल. तुमच्या बद्दल गैरसमज करून देण्यात येईल. जानेवारीमध्ये दिलासा देणारी घटना घडेल. नोकरी तुम्हाला जुलैपर्यंत टिकवून ठेवायची आहे. त्यानंतर तुम्हाला नवीन बदल करण्याची प्रगती कारक संधी मिळेल. घर जमीन संबंधी समस्या सोडवण्यास ग्रहांची साथ मिळेल. कौटुंबिक सुखात भर पडेल. न मिळालेली सौख्ये प्राप्त होतील. नव्या वळणाने आयुष्य सुरू कराल. व्यवसायात चांगली सुधारणा जुलैपासून होईल. जूनमध्ये मोठे कंत्राट मिळण्याचा योग येईल. तेव्हा जपून विचार करून गुंतवणूक करा. व्यवहार मोठा असेल कायदा मात्र पाळा. एप्रिल, जुलै मध्ये प्रकृतीची काळजी घ्या. संताप करून प्रश्न सुटत नाही. सहनशीलता व नम्रता ठेवा. म्हणजे मार्ग शोधता येईल. वाहनाचा खर्च निघेल. वाहनाचा वेग कमी ठेवा. ऑक्टोबरमध्ये कोणताही वाद वाढवू नका. राजकीय सामाजिक क्षेत्रात मागील काळात झालेल्या चुका सुधारण्याची संधी मिळेल. त्याचा पुरेपूर उपयोग करा. जानेवारी, जुलै ते सप्टेंबर तुमच्या कार्याला वेगाने पुढे नेता येईल. पद अधिकार मिळेल. तुमच्या कार्याचा गौरव होईल. अधिक जनसंपर्क वाढवता येईल. मार्च, एप्रिल, जुलै मध्ये बोलण्यात चूक करू नका. व्यवहार करताना काळजी घ्या. कायद्याच्या विरोधात जाऊ नका. मे, जुलै मध्ये विरुद्धलिंगी व्यक्तीकडून समाज कार्यात मनस्ताप होईल. मोहाला बळी पडू नका. मनातील गुप्त गोष्टी व्यक्त करताना काळजी घ्या. भावनेच्या आहारी जाऊन भलते आश्वासन कुणालाही देऊ नका. चिंतन पूर्वक निर्णय घेता येईल. फक्त उतावळेपणा करु नका. धाडस करणे योग्य ठरणार नाही. तुमच्या यशाचा झेंडा फडकत राहण्यासाठी मेहनत घ्या. कामाचे नियोजन करा. सातत्याने परिश्रम घ्या. तुमचे ध्येय तुम्हाला गाठता येईल. स्वतःचे स्थान मजबूत करून ठेवा मग क्षेत्र कोणतेही असो. पैसा, जनसंपर्क, तुमची प्रतिष्ठा यांची जास्तीत जास्त वाढ करा म्हणजे पुढील रस्ता सोपा ठरेल.

# धनु

मागील वर्षात तुम्ही चांगल्या प्रकारे समस्या सोडवल्या आहेत. साडेसाती सुरू आहे तरी तुमच्या क्षेत्रातील तुमची प्रगती तुम्ही कराल. प्रत्येक काम करताना कायदा पाळूनच पुढे जा. मे, जून, जुलै 2022 मध्ये अचानक चांगली संधी तुम्हाला मिळेल. शिक्षणाच्या बाबतीत जिद्द कायम ठेवा. धरसोड वृत्ती जुलै, नोव्हेंबर मध्ये करू नका. जुलैमध्ये परीक्षेसाठी जास्त तयारी करा. ऑगस्ट-सप्टेंबर मैत्रीत तणाव होईल. प्रवासात सावध रहा. वाद वाढवू नका. इतरांना मदत करताना स्वतःची फसगत करून घेऊ नका. नोकरीच्या ठिकाणी जानेवारी ते एप्रिल तुमचे वर्चस्व वाढेल. तसेच नवीन उत्तम बदल करण्याची संधी शोधता येईल. मे, जुलैमध्ये वरिष्ठांचा रोष होईल असे कृत्य टाळा. नकळत कामात चुक होईल. मनाप्रमाणे कामे करण्याचा उत्साह व आत्मविश्वास या वर्षात वाढेल. राजकीय-सामाजिक क्षेत्रात तुमच्या बाजूने अनेक चांगल्या व्यक्ती उभ्या राहतील. तुम्हाला पद अधिकार मिळेल. योजनांना चांगल्या पद्धतीने राबवता येईल. जनसंपर्क वाढवता येईल. त्यामुळे पद्धतशीर कामांचे नियोजन करा. वेगाने पुढे जा. वर्चस्व वाढता. आर्थिक सहाय्य मिळवून गरजू जनतेसाठी उत्तम प्रकारचे कार्य करता येईल. जनहित म्हणजेच खरा सेवा धर्म होय. तुम्ही मोठेपणा साठी कार्य करत नाही हा तुमचा खरा स्वभाव आहे. परंतु अधिकार असल्यास आपण शुद्ध उत्तम प्रकारचे समाज कार्य ही करू शकतो हे विसरू नका. मागे राहू नका. जून, ऑगस्टमध्ये विरुद्धलिंगी व्यक्तीकडून मनस्ताप होईल. कोणताही मोह ठेवू नका. महत्वाच्या वस्तू नीट सांभाळा. कौटुंबिक समस्या या वर्षात कमी करता येतील. कौटुंबिक वाटाघाटी संबंधित चर्चा जानेवारी ते एप्रिल मध्ये करा. कोर्ट केस संबंधी कामे करा. कागदोपत्री तुमचे नाव घाला. व्यावहारिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे असते. समोरच्याला न फसवता आपले हित साधणे गैर नाही. पती-पत्नीमधील दुरावा कमी करून नव्या जीवनाला सुरुवात करा. घटस्पोटा संबंधी प्रश्न सोडवा. अविवाहितांना लग्नासाठी योग्य स्थळे मिळतील. प्रयत्न करा. संतती प्राप्तीसाठी चांगला कालावधी आहे. चौफेर लक्ष देऊन तुम्ही तुमच्या क्षेत्रात प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकता. मे,जून, जुलै मध्ये बोलताना काळजी घ्या. आश्वासन देताना घाई करू नका. पुढील वर्षासाठी शुभेच्छा.

# मकर

या वर्षात तुम्ही जे ठरवाल ते करुन दाखवण्याची ताकद तुम्हाला ग्रहमान देणार आहे. मागील वर्षात तुम्ही अनेक प्रकारचा त्रास भोगला. अन्याय सहन केला. परंतु या 2022 मध्ये तुमच्यावरील दडपण कमी होईल. नव्या विश्वासाने उत्साहाने तुम्ही कार्य आरंभ कराल. मेहनत करणारे लोक नेहमीच पुढे जातात. सातत्य ठेवा. योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या आणि तुमच्या क्षेत्रात तुम्ही नव्या वाटेने वाटचाल करा. तुम्हाला रोखणे सोपे नाही. नोकरीत चांगला बदल होईल. मनाप्रमाणे कामे होतील. परदेशात जाण्याचा मार्ग खुला होईल. एप्रिल, जून, ऑगस्ट मध्ये प्रतिष्ठा कमी करणारे प्रसंग येतील. तुम्ही संयम ठेवा. तात्पुरत्या अडचणी येतील. काम करताना सावध राह. बेकायदा कृत्य करू नका. वरिष्ठांना दुखावणे योग्य ठरणार नाही. व्यवसायात जम बसेल. मनाप्रमाणे विस्तार करण्याची संधी मिळेल. कोर्टकचेरीच्या अडचणी सोडवता येतील. भांडवलदार मिळतील. शेअर्समध्ये फायदा वाढेल. जुलैमध्ये व्यवसायीक करार सावधपणे करा. कौटुंबिक सुखात भर पडेल. अविवाहितांना लग्नासाठी प्रयत्न करता येईल. प्रेम प्रकरणाला योग्य वळण देता येईल. घर वाहन जमीन दुकान इत्यादी खरेदी विक्री करता येईल. तुमचे अधुरे स्वप्न पूर्ण होईल. तुम्ही ज्या क्षेत्रात असाल तेथे चमकाल. राहून गेलेले काम पूर्ण करता येईल. प्रेरणादायी घटना जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, मे, जुलै मध्ये घडतील. जानेवारी, जुलै, ऑक्टोबर मध्ये तणाव, चिंता, वाद होईल. प्रवासात सावध रहा. प्रकृतीची काळजी घ्या. हाय ब्लडप्रेशरचा त्रास होईल. कोर्टाच्या कामात नम्रता ठेवा. कायदा मोडू नका. राजकीय-सामाजिक क्षेत्रात तुम्ही घेतलेले परिश्रम तुम्हाला समाधान देतील. अधिक मोलाची संधी समोरून येईल. विचारपूर्वक निर्णय घ्या. विरोधक मैत्रीची आशा ठेवतील. तुमच्यासोबत काम करण्यासाठी अनेक लोक तयार होतील. तुमचे चौफेर कौतुक होईल. पद मिळेल. जनहिताच्या कार्यात अग्रेसर राहाल. आर्थिक सहाय्य मिळाल्याने तुम्ही लोकांच्या साठी चांगला समाज उपयोगी संस्था काढू शकाल. योजना बनवाल. अनेक क्षेत्रात तुम्ही यशाचा तुरा मिरवाल.

# कुंभ

मागील वर्षी पेक्षा 2022 तुम्हाला अधिक प्रगती कारण ठरणार आहे. साडेसातीचे पर्व सुरू आहे. त्यामुळे समतोल प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. नोकरीच्या ठिकाणी तुम्हाला चांगली संधी उपलब्ध होईल. तुमच्या कामाचा प्रभाव पडेल. कंपनीद्वारा परदेशात जाण्याची संधी मिळेल. तसेच नोकरीत वाद कोर्ट केस सुद्धा संपवता येईल. फेब्रुवारीपासून तुमच्या कार्याला नवी दिशा मिळेल. ग्रहांची साथ असताना तुम्ही केलेले प्रयत्न अधिक वेगाने फलद्रूप होतात. त्यामुळे मार्गदर्शक म्हणून ज्योतिष शास्त्र नेहमीच उपयुक्त ठरेल. कोणताही अतिरेक करणे नेहमीच घातक ठरते. व्यवसायात चांगला बदल करण्याची संधी एप्रिल ते जुलै या कालावधीत मिळेल. कर्जाचे काम होईल. नवीन परिचय एप्रिल-मे जुलै मध्ये होतील. त्यातूनच कामे मिळतील. तुमच्या कार्याला थोरामोठ्यांचे सहकार्य मिळेल. कौटुंबिक समस्या वर्षाच्या उत्तरार्धात कमी होतील. मुलांच्या साठी चांगला विचार करता येईल. घरात आनंदी घटना घडतील. अविवाहितांना लग्न साठी चांगली स्थळे शोधता येतील. दूरच्या प्रवासाचा बेत या वर्षात करता येईल. कौटुंबिक वाटाघाटी संबंधित चर्चा सफल होतील. घर दुकान जमीन इत्यादी खरेदी विक्री फायदेशीर ठरेल. योग्य सल्ल्याने शेअर्समध्ये गुंतवणूक केल्यास मोठा लाभ मिळेल. पती पत्नी मधील दुरावा संपवून नव्या आनंदित जीवनाकडे वाटचाल करू शकाल. राजकीय सामाजिक क्षेत्रात अधिकार वाढतील. प्रतिष्ठा मिळेल पदाधिकारी मिळाल्याने जनकल्याणकारी कार्य वेगाने पुढे नेता येतील. लोकसंग्रह लोकप्रियता यात अधिक वेगाने वाढ होईल. तुमचे डावपेच फारच प्रभावी ठरतील. फेब्रुवारी, मार्च, ऑगस्टमध्ये प्रवासात सावध राहा. वाहनापासून धोका होईल. तणाव जास्त वाढवू नका. प्रकृतीची काळजी घ्या. रागावर नियंत्रण ठेवा. तुमच्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटवता येईल. आर्थिक सहाय्य करणारे दाता मिळतील. त्यामुळे समाजकार्याचा विस्तार करता येईल. गरजू लोकांच्या साठी वेगवेगळ्या योजना संस्था वाढवता येतील. प्रगतीचा आलेख आता उंचावर जाणार आहे. तुम्ही प्रामाणिक प्रयत्न करा म्हणजे उत्तम यशाचे मानकरी व्हाल.

# मीन

नवीन वर्ष सुरुवातीला सर्वसाधारण राहील. निराश होण्याचे कारण नाही. 2021 मध्ये तुम्ही अनेक समस्या पाहिल्या असतील. त्याच प्रमाणे अनेक विचारांच्या व्यक्तींचे अनुभव घेतले असतील. त्यामुळे तुमच्या ज्ञानात भर पडली असेल. अनेक विचारवंतांचा अनेक सामान्य व्यक्तींचा जीवनक्रम पाहिला असेल. त्यामुळे स्वतःच्या जीवनात आलेली संकटे वेगळी असली तरी प्रत्येक माणूस कधी ना कधी ग्रह चक्रात अडकतो तसेच ग्रह चक्राचा फेरा त्याला त्यातून बाहेर काढतो. मे 2022 पासून तुम्हाला नवी दिशा मिळण्यास सुरुवात होईल. गेलेला आत्मविश्वास पुन्हा नव्याने तयार होईल. फेब्रुवारी, ऑगस्ट, ऑक्टोबर मध्ये नोकरीच्या कामात चूक होईल. आरोप येईल. सावध रहा. जुलै, सप्टेंबर मध्ये नोकरीत बढती मिळेल. बेकारांना नोकरी मिळेल. समस्या कमी होतील. व्यवसायात कोणताही बदल वर्षाच्या सुरुवातीला करणे योग्य ठरणार नाही. एप्रिल पासून पुढे चांगली सुधारणा धंद्यात करता येईल. जून-जुलै कोणतेही बेकायदा काम कोणत्याही क्षेत्रात करू नका. नकळत तुम्ही एखाद्या प्रकरणात अडकू शकता. मोह ठेवू नका. दुर दृष्टिकोन ठेवा. राजकीय-सामाजिक क्षेत्रात तुमच्या अधिकारात वाढ होईल. मे, जून, जुलै, ऑगस्ट उत्साहवर्धक ठरतील. तुमच्या प्रत्येक कार्याला पुढे नेण्याची संधी मिळेल. अनेकांचे सहकार्य मिळेल. दिग्गज व्यक्ती तुमच्या कामाचे कौतुक करतील. आर्थिक सहाय्य मिळाल्याने समाज उपयोगी योजना राबवता येतील. लोकप्रियता वाढेल. अधिकारी पद मिळेल. तुमचा आत्मविश्वास प्रबळ होईल. तुमच्या आवडत्या क्षेत्रात तुम्ही पुन्हा सक्रिय व्हाल. शिक्षण क्षेत्रात राहून गेलेले शिक्षण पूर्ण करता येईल. हातून झालेली एखादी चूक सुधारता येईल. तुमच्या हुशारीचे बुद्धिमत्तेचे सत्य समोर येईल. मानसन्मान मिळेल. एप्रिल, ऑक्टोबरमध्ये प्रकृतीची काळजी घ्या. रागावर ताबा ठेवा. संतप्त प्रतिक्रिया टाळा. हाणामारीच्या प्रकरणात गुंतू नका. ऑपरेशन होण्याची शक्यता निर्माण होईल. सतर्क राहा. काळजी घेतल्यास काही गोष्टी टाळता येतील. चिंता नको. चिंतन करा. कुटुंबातील तणाव कमी होईल. घर वाहन जमीन दुकान इत्यादी खरेदी विक्री करता येईल. आपसातील वाद विवाद मिटवून नव्याने संसार सुरू करू शकता. अविवाहितांना लग्नासाठी स्थळे मिळतील. जीवनाला चांगली कलाटणी निश्चितच मिळेल.